महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परिक्षांकरिता सुट्टीच्या दिवशी शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये उपलब्ध करून देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण १११७/प्र.क्र.३८५/एस एम-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २१ फेब्रुवारी, २०१८

वाचा :

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मलोआ-१०१२/प्र.क्र.३८५/एस एम-१, दिनांक १० मे, २०१२.

शासन परिपत्रक :

महाराष्ट्र शासनाच्य संबंधित विभागाच्या मागणीच्या आधारे शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वेळोवेळी परिक्षांचे आयोजन केले जाते. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून शाळा/ महाविद्यालये उपलब्ध करून देण्याबाबत मागणी केली जाते व बहुतांशी शाळा/ महाविद्यालयांकडून नकार दिला जातो. परिणामी शाळा/ महाविद्यालयाच्या असहकाराचा विपरित परिणाम आयोगाच्या परिक्षा आयोजनावर होत असतो. ही बाब विचारात घेऊन आयोगाच्या परिक्षांकरिता मागणीनुसार शाळा/ महाविद्यालये उपलब्ध करून द्यावीत अन्यथा त्यांच्याविरूध्द कार्यवाही करण्यात येईल असे निदेश संबंधितांना संचालक, शिक्षण यांच्यामार्फत देण्याचे संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये स्पष्ट केले आहे.

२. या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, राज्यातील अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित/ स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये सुट्टीच्या दिवशी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षांकरिता मागणीनुसार उपलब्ध करून द्यावीत अन्यथा त्यांच्याविरूध्द कारवाई करण्यात येईल, असे निदेश/ सूचना शिक्षण संचालक (प्राथमिक) व शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी सर्व शैक्षणिक संस्था व अन्य संबंधितांना द्यावेत.

३. सर्व संबंधितांनी वरील निदेशाचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०२२१११११३१३९०२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe
Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2018.02.21 11:13:58 +05'30'

(प्रविण मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०० ०२१.

२. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
३. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
६. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद
७. सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद
८. शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील सर्व कार्यासने
९. निवडनस्ती, एस एम-१.